www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , अलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 213 वा शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# निलंबित PSI रणजीत कासले पुण्यात दाखल; निवडणुकीत गप्प राहण्यासाठी कराडने पैसे दिल्याचा आरोप?

गेल्या काही दिवसांपासून बीडमधील घडामोडींमुळे जिल्ह्यातील तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. बीडमध्ये घडलेल्या गुन्हेगारीच्या घटनांची राज्यभरात चर्चा सुरु आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या वाल्मिक कराडमुळे धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी खळबळजन आरोप केले होते. वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्याचा प्रयत्न धनंजय मुंडे यांनी केल्याचा दावा रणजीत कासले यांनी केला होता. त्यानंतर ते गायब झाले होते. मात्र आता गुन्हा दाखल



झाल्यानंतर रणजीत कासले पुण्यात परतले. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला. खळबळजनक आरोप करणारे बीड सायबर पोलिस ठाण्यातील वादग्रस्त निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले याच्यावर अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला होता. माजी मंत्री धनंजय मुंडे, संतोष देशमुख खून प्रकरणातील प्रमुख आरोप वाल्मिक कराडवर रणजित कासलेंनी गंभीर आरोप केले होते. मला वाल्मिक कराडचे एन्काऊंटर करण्यासाठी ऑफर देण्यात आली होती, असा दावाही कासलेंनी केला होता. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर कासले गायब झाले होते. मात्र आता निलंबित पोलीस अधिकारी रणजित कासले पुण्यात दाखल झाले आहेत. आपण पुणे पोलिसांना शरण जाणार असल्याचे कासले यांनी सांगितले. पुणे विमानतळावर माध्यमांशी बोलताना कासले यांनी विधानसभा निवडणुकीत गप्प राहण्यासाठी वाल्मिक कराडने दहा लाख रुपये दिल्याचे सांगितले. "पुणे पोलिसांना शरण जाण्यासाठी मी आलो आहे. १५ दिवस तरी मला कोणी पकडले नसते. पण माझ्या मित्रांशी बोलून मी निर्णय घेतला. बीडला जाऊन मी शरण जाणार आहे. पुणे पोलिसांना तशी मी विनंती केली आहे की मला संरक्षण देऊन बीड पोलिसांच्या स्वाधीन करावे. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी माझ्या खात्यावर १० लाख रुपये जमा करण्यात आले होते. त्यातील साडेसात लाख रुपये मी परत केले आहेत. मतदानाच्या दिवशी दहा लाख रुपये ईव्हीएमपासून दूर राहण्यासाठी दिले होते," असा दावा कासले यांनी केला. "संत बाळूमामा कंस्ट्रक्शन कंपनी ही वाल्मिक कराडच्या मालकीची आहे. या कंपनीत महादेव कराड आणि काळे हे पार्टनर आहेत. त्यांच्या कंपनीतून माझ्या बँक खात्यावर दहा लाख रुपये आले होते. यातले साडे सात लाख रुपये मी परत केले आहेत. उर्वरित पैशातून माझा खर्च चालू आहे. ईव्हीएम मशीनपासून दूर जायण्यासाठी तसेच मी गप्प बसावे म्हणून मला हे दहा लाख रुपये देण्यात आले होते. परळीला माझी ड्यूटी होती. धनंजय मुंडे हे चुकीच्या पद्धतीने निवडून आले आहेत," असेही कासले म्हणाले.

## खांदा कॉलनीत डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्यात सर्व संघटना सामील झाल्याने उदंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

खांदा कॉलनी मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्यात यंदा सर्व संघटना सामील झाल्याने मिरवणुकीला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसत होते या मिरवणुकीत प्रबोधात्मक संदेश म्हणून विविध देखावाचे आयोजन करण्यात आले होते या मिरवणुकीत आर पी आय भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सांस्कृतिक मंडळ बौद्धजण पंचायत समिती व विविध संघटना सामील झाल्याने मिरवणुकीत प्रचंड गर्दी झाल्याचे दिसत होते मुलगंधकुटी विहार येथे तीन दिवस चाललेल्या आंबेडकर महोत्सवात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यात निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा विविध संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते येथील कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर आमदार विक्रांत पाटील यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या तसेच विविध राजकीय पक्षाचे नेते माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड माझी उपमहापौर सिताताई पाटील भाजप नेते भीमराव पोवार परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे जयंत भगत संजय कांबळे सागर पगारे इत्यादी राजकीय नेते सामील झाले होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर पी आय अध्यक्ष दिनेश जाधव मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कांबळे मुकुंद रोटे रमेश गायकवाड चंद्रसेन कांबळे संदीप भालेराव श्याम लगाडे इत्यादी सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली

## सराईत आरोपीकडून यामाहा कंपनीची दुचाकी गाडी जप्त

### भारती विद्यापीठ पोलिसांची दमदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**




**पुणे** – दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास कात्रज चौकातील उसाचा रस विक्री दुकानासमोरील रस्त्यावर फिर्यादी अभिजीत शिवाजी घोरपडे (वय २०, रा. उत्कर्ष सोसायटी, कात्रज) यांनी यमाहा कंपनीची आर.एक्स. १०० (गाडी क्र. WNH2460) पार्क केली होती. मात्र, अज्ञात इसमाने ती दुचाकी चोरी केली. फिर्यादीच्या तक्रारीवरून भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधान २०२३ चे कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा (गु.र.नं. २१५/२०२५) दाखल करण्यात आला. वाहन चोरीचे प्रमाण वाढल्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी यांच्या नेतृत्वाखाली एक तपास पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान पोलिसांना गुन्हा सराईत आरोपी मिथुन सुगंध लोखंडे (वय २२, रा. सहकारनगर) याने केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून चोरीस गेलेली यमाहा आरएक्स १०० दुचाकी जप्त करण्यात आली असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त मा. अमितेश कुमार, सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त प्रविणकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त श्रीमती स्मार्तना पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास पथकात पोलीस निरीक्षक राहुलकुमार खिलारे, पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे, महेश बारवकर, मंगेश पवार, सचिन सरपाले, सचिन गाडे, निलेश खैरमोडे, तुकाराम सुतार यांचा समावेश होता.

## सणसर गावात पालखी महामार्गाचे काम बंदोबस्तात सुरु

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे रखडलेले कामास अखेर गुरुवारी सकाळी पोलीस बंदोबस्तात सुरवात करण्यात आली असल्याचे दिसून आले. यावेळी बारामती विभागीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार मंडलअधिकारी, तलाठी, वालचंदनगर पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक टेळकीकर साहेब व पोलीस हवालदार गुलाबराव पाटील,गणेश काटकर, गोलांडे,अजित थोरात व सहकारी पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थितीत सणसर प्राथमिक आरोग्य केंद्राशेजारी अडवण्यात आलेला पालखी रस्त्याचे काम पोलीस बंदोबस्तात सुरु करण्यात आले. यावेळी पालखी महामार्गचे ठेकेदार यांची संपूर्ण टीम उपस्थित होती.

## यावर्षी भरभरून पाऊस : महाराष्ट्रातही सरी वर सरी बरसणार.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**




यंदा मान्सूनच्या काळात भारतातील अनेक भागात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होईल. यावर्षी चा हा अंदाज नेहमी कोरडा दुष्काळ असणाऱ्या मराठवाड्यासह महाराष्ट्राला दिलासा देणार आहे. शिवाय अलनिनो ची स्थिती उद्‌भवण्याची शक्यता नसल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने म्हटले आहे. दुष्काळ पाचवीलाच पूजलेला मराठवाडा व तेलंगणामध्ये यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल तर महाराष्ट्राचा विचार करता राज्याच्या बहुतांश भागात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक असेल असे आय एम डी च्या अंदाजात नमूद करण्यात आले आहे. आय एम डी चे प्रमुख मृत्युंजय महापात्रे यांनी हा अंदाज वर्तवला आहे. यंदा एकूण पाऊस दीर्घावधीतील ८७ सेंटीमीटर सरासरीच्या १०५% राहील . अल निनोचा अडसर यंदा नसेल. त्याचबरोबर सध्या देशातील अनेक भागात तापमान वाढत चालले असून एप्रिलच्या मध्यापासून जून पर्यंत प्रचंड उष्मा जाणवेल. त्यामुळे वीजनिर्मितीवर दबाव निर्माण होईल. शिवाय पाणी टंचाई ही प्रकर्षाने जाणवेल.

## माहेर महिला प्रतिष्ठानच्या वतीने चिरनेर येथील आश्रम शाळेतील मुलांना शाळेय उपयुक्त साहित्य वाटप !!




**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील आदिवासी,कातकरी मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी गणवेश ६००,दोन कपाटे,५०० पुस्तके माहेर महिला प्रतिष्ठानच्या वतीने शुक्रवार दि.१८/०४/२०२५ रोजी नवी मुबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलाश शिंदे(I.A.S) यांच्या हस्ते व प्रसिध्द अभिनेता(चित्रपट नाट्य) संदिप पाठक यांच्या उपस्थितीत २४० मुलांना वाटप करण्यात येणार असून रिमोट व मोबाईल दुनियेत करोना पासून फक्त मोबाईल हातात दिसतो.नुकताच महाराष्ट्राला " मराठी " अभिजात दर्जा प्राप्त झाला असून महात्मा **पान २ वर**

## रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

आशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संदर्भातील विविध समस्यांबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत एक महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संस्थेला शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासित केले. मंत्रालयात नामदार अजित पवार यांच्या दालनात झालेल्या या बैठकीस रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, थोर देणगीदार व मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार विश्वजित कदम, इतर पदाधिकारी, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रयत शिक्षण संस्था ही ७५० हून अधिक शाखा आणि या वर्षात सुमारे साडेचार लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी अग्रगण्य संस्था आहे. "श्रमप्रेमी शिक्षण" ही संस्थेची खास ओळख आहे. रयत शिक्षण संस्था ही समाजातील सर्व स्तरांतील लोकांना, विशेषतः सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास व वंचित घटकांना शिक्षण देण्यास कटिबद्ध आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीत, सध्याच्या शिक्षणपद्धतीचे सर्व स्तरांवर पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरण यामुळे शिक्षण क्षेत्रातील संकल्पना आणि संदर्भ बदलले आहेत. त्यामुळे पारंपरिक अध्यापन पद्धतींपासून थोडेसे बाजूला जाऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि नव्या शिक्षणविधींचा स्वीकार करणे काळाची गरज बनली आहे. ही गरज ओळखून, रयत शिक्षण संस्थेने नव्या प्रवाहांशी जुळवून घेण्याची प्रक्रिया सक्रियपणे सुरू केली आहे.आधुनिक काळातील शैक्षणिक बदलांशी जुळवून घेत संस्था सातत्याने गुणवत्ता आणि



मूल्याधारित शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेच्या कार्यात येणाऱ्या अडचणी आणि धोरणात्मक बाबींवर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक दृष्टिकोन दाखवत रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्यास शासन स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे सांगितले.

## दैनिक युवक आधारचे पत्रकार श्री. विकास वायाळ यांची "मुंबई प्रदेश सचिव – युवा ग्रामीण पत्रकार संघ" पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर**



महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी श्री. विकास वायाळ यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या मुंबई प्रदेश सचिव पदावर नियुक्ती झाली आहे. ही निवड त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाची आणि समाजासाठी केलेल्या प्रामाणिक कार्याची पोचपावती आहे.

या नियुक्तीबद्दल त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत असून संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी आणि सहकारी यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. श्री. वायाळ यांनी सांगितले की, "ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासह एक मोठं आव्हान आहे. ग्रामीण पत्रकारांची भुमिका आणि प्रश्न मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन." युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या या नियुक्तीमुळे मुंबईतील पत्रकारितेच्या क्षेत्रात नवचैतन्य येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. श्री विकास वायाळ हे गेले अनेक वर्ष चित्रपट सृष्टी मध्ये अक्टर रायटर डिरेक्टर काम करीत आहेत त्यांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत
महाराष्ट्र कलाकार महासंघ महाराष्ट्र राज्य
ओम साई प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन
तसेच दादासाहेब फाळके चित्रपट युनियन मार्फत यांना बेस्ट सपोर्टिव्ह ऍक्टर 2024 हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे दादासाहेब फाळके चित्रपट युनिव्हर्सिटी मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेश कचलवार सर यांनी श्री विकास वायाळ यांना नियुक्तीपत्र बहाल केले आहे

## धुतूममधील इंडियन ऑईल-अदानी प्रकल्पात भीषण स्फोट;

### घरांना हादरे, कामगार जखमी, ग्रामस्थ संतप्त!

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

देशभरात 14 एप्रिल पासून अग्नी शमन सेवा सप्ताह सुरु असून या सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशीच उरण तालुक्यातील धुतूम ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या इंडियन ऑईल अदानी व्हेंचर लिमिटेड या प्रकल्पात दि. 16 एप्रिल सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत एक कामगार रोहित सनगर हा इंजिनिअर होरपळून गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने नवी मुंबईतील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. स्फोटाची तीव्रता इतकी जबरदस्त होती की धुतूम गावातील अनेक घरांना हादरे बसले. घाबरलेल्या गावकऱ्यांनी सुरक्षित स्थळी धाव घेतली असून परिसरात भीतीचे वातावरण आहे. या घटनेनंतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने प्रकल्पाच्या प्रवेशद्वारावर जमले होते.

ग्रामपंचायत सदस्य प्रेमनाथ ठाकूर यांनी सांगितले की, "अचानक जोरदार स्फोटाचा आवाज येताच आमच्या घराला हादरे बसले. मी चौकशीसाठी गेलो असता, गेटवर कंपनीतील स्फोटात एक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली. मात्र, आतमध्ये परिस्थिती गंभीर असल्याने प्रवेश दिला गेला नाही. मागील महिनाभरात हा दुसरा स्फोट असून आम्ही याबाबत कंपनी प्रशासनाशी लेखी पत्रव्यवहार केला, तरीही त्यांनी कोणतीही माहिती अथवा सहकार्य दिलेले नाही. त्यामुळे ग्रामस्थांचे भवितव्य धोक्यात आले आहे." घटनेची माहिती मिळताच उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सिडको व जेएनपीटी अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. दरम्यान, प्रकल्प प्रशासनाने या घटनेवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. वारंवार होणाऱ्या अशा अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, ग्रामस्थांनी आता ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे.





## पी व्ही आर सिनेमा व्यवस्थापनावर अट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

### डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा होत असताना पी व्ही आर सिनेमाचा जातीवाद आला चव्हाट्यावर !

**पनवेल / मुकुंद कांबळे**

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महारष्ट्रात साजरी होत असताना पनवेल मधील ओरिअन मॉल मध्ये असलेल्या पी व्ही आर चित्रपटगृह प्रशासनांनाने जातीवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या महाराष्ट्रात जय भीम पॅन्थर हा सिनेमा प्रदर्शित झाला असून चित्रपट प्रदर्शनास अनेक अडचणी येत आहे अगोदरच सेन्सर बोर्डाने जाचक अटी टाकून निर्मात्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला त्यातच पँथर नामदेव ढसाळ कोण आहेत आम्हाला माहित नसून असे वक्त्यव्य करून अकलेचे तारे तोडले आणि वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला या सर्व संघर्षातून चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आणि त्यातच या सिनेमासाठी जातीवादी चित्रपटगृह चित्रपट लावत नाही हा संघर्ष एकीकडे सुरु असताना पनवेल मध्ये पी व्ही आर सिनेमागृहात सिनेमा सुरु करण्या पूर्वी सिनेमा गृहाचा ए सी बंद केला. जेव्हा प्रेक्षकांनी सांगितलं ए सी बंद का केला तेव्हा सिनेमागृहाच्या व्यवस्थपकानी उडवा उडवीची




उत्तर दिली. व्यवस्थापक आणि प्रेक्षकांत वाद निर्माण झाला आणि तो वाद पनवेल शहर पोलीस स्थानकात गेला त्या वेळी आर पी आय आठवले गटाचे पनवेल महानगरपालिका जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांना बातमी कळताच पी व्ही आर च्या व्यवस्थापनेवर ऍट्रॉसिटी चा गुन्हा दाखल केला. व ज्या प्रेक्षकांनी सिनेमाची तिकिटे घेतली होती त्यांना त्यांचे पैसे परत देण्यासाठी किंवा पुन्हा तो सिनेमा दाखवण्या साठी सूचना केल्या. जर पुन्हा असे घडले तर पी व्ही आर सिनेमा आम्ही फोडून टाकू अशी धमकी वजा सूचना देण्यात आली. या प्रसंगी आर पी आय चे पनवेल महानगर पालिका क्षेत्र जिल्हा युवा अध्यक्ष अक्षय आहिरे, युवा नेता सुरेंद्र सोरटे, मिलिंद कांबळे आदी सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दत्तात्रेय देवस्थान चिंचवली गोरेगाव यात्रा उत्सवाचे आयोजन...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**माणगांव** :-माणगाव तालुक्यातील कुणबी समाज बत्तीशी विभाग श्रीदत्तात्रेय देवस्थान ट्रस्ट चिचवली गोरेगांवची जनरल सभा ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश केरु टेंबे यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली सदरहू सभेमध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री दत्तमहाराजांची यात्रा (बुवाची यात्रा) उत्सव साजरा करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू यात्रा उत्सव सोमवार दिनांक २१/०४/२०२५ रोजी साजरा करण्यांत येणार आहे. गेली अनेक वर्षे ही यात्रा मोठ्या उत्साहामध्ये साजरी होत असते. या यात्रेकरीता महाड तालुक्यातील दादली येथील लेझीम पथक व आकर्षक खालुबाजा ठेवण्यांत आलेला आहे. संध्याकाळी ६.०० वाजता श्री दत्तमहाराजांची पालखी व जतरकाठी घेऊन लेझीम पथक नाचवित सर्व समाज बांधव, मानकरी व मान्यवर श्री भैरवनाथ मंदीर गोरेगांव येथे जाऊन, भैरवनाथांची पालखी व जतरकाठी घेऊन पुन्हा दत्तमंदिरामध्ये येत असते. त्यावेळेस यात्रा उत्सवाला सुरुवात होत असते. यावेळेस हजारो भाविक दत्तमंदिरामध्ये येऊन दत्तमहाराजांचे दर्शन घेत असतात. यात्रेचे नियोजन योग्य पध्दतीने होणेकरीता कमिट्या स्थापन केलेल्या असुन त्यामध्ये तक्रार निवारण कमिटीच्या अध्यक्षपदी. माजी अध्यक्ष शिवसेना संपर्कप्रमुख रायगड अरुण चाळके तसेच यात्रा उत्सव कमिटी अध्यक्ष म्हणुन युवा उदयोजक निलेश केसरकर तसेच दक्षता कमिटीचे अध्यक्ष म्हणुन तरुण नेतृत्व सुधाकर काशिराम करकरे तसेच प्रसिध्दी प्रमुख म्हणून रायगड जिल्हयामध्ये नावलौकीक असलेले पत्रकार राम सिताराम सिताराम भोस्तेकर यांची निवड करण्यांत आलेली आहे. या सर्व पदाधिका-यांची बिनविरोध निवड करण्यांत आलेली असून उपस्थितांनी टाळयांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. यावेळी यात्रेकरीता नामदार मंत्री भरत गोगावले रोजगार हमी, फलोत्पादन व खारभुमि विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य व अनेक मान्यवर उपस्थित रहाणार आहेत. तरी सर्व भाविक भक्तांनी, यात्रेकरीता येणा-या दुकानदारांनी सर्व समाज बांधवांनी व सर्व समाजातील लोकांनी यात्रेकरीता उपस्थित राहुन श्री दत्तमहाराजांचे दर्शन घ्यावे व यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती श्री दत्तात्रेय देवस्थान ट्रस्ट चिंचवली गोरेगांव चे सेक्रेटरी पंढरी शेडगे व सर्व विश्वस्त मंडळ करीत आहे. या जनरल सभेकरीता अध्यक्ष प्रकाश टेंबे, उपाध्यक्ष नथुराम करकरें, सेक्रेटरी पंढरी शेडगे, सहसेक्रेटरी संतोष भात्रे, खजिनदार मधुकर नाडकर, सल्लागार अरुण चालके, सल्लागार सिताराम उभारे, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, दगडू तोंडलेकर, वामन बैकर, रामचंद्र सत्वे, बाबु जुमारे, राजाराम टेंबे, अशोक शिंदे, सुधाकर करकरे,निलेश केसरकर,गजानन भोईर,राम भोस्तेकर सुजित भोजने, चंद्रकांत भोजने,परेश अंधेरे अरुण तोंडलेकर,राघो शिगवण, संतोष मालोरे ट्रस्टचे सर्व विश्वस्त व सभासद तसेच मोठ्या संख्येने उपशिथत राहून यात्रा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करणेबाबत ठरविण्यांत आले. या उत्सवात सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन समाजबांधवांन कडून करण्यात आले आहे.



# सावरगाव येथील गावकऱ्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह अधीक्षक अभियंत्यांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक**
**:प्राचार्य जगन्नाथ रासवे**

संकन पुरी सावरगाव रस्त्याच्या कामासह पुलासाठी ११ कोटीचा निधी मंजूर झालेला होता हे काम नळगे इन्फ्रास्ट्रक्चर कंत्राटदार कंपनीने घेतले होते मात्र गेल्या एक वर्षापूर्वी उद्घाटन होऊनही काम सुरू न झाल्याने गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून यासंदर्भात अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा प्रसिद्धी पत्रकार द्वारे देण्यात आलेला आहे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावत या संकनपुरी सावरगाव रस्त्यासह पुलाचे काम मंजूर करून घेतले मात्र निविदा भरणाऱ्या कंपनीने काम घेऊन ही एक वर्षापासून रस्ता व पुलाचे काम न केल्यामुळे , सावरगाव येथील गावकरी प्रचंड संतापले असून, गेल्या दोन वर्षांपूर्वी नदीला पूर आल्यामुळे सावरगावला पाण्याचा वेढा पडला होता त्या मुळे सावरगाव गावकऱ्यांना धोका निर्माण झाला होता या पार्श्वभूमीवर हा पूल होणे गरजेचे होते मात्र ११ कोटी रुपयाचे काम घेऊन ठेवत नळगे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने सदरील कामाला बगल दिली असून, यामुळे गावकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट असून यासंदर्भांमध्ये माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर अधिकक्ष अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना त्यांनी निवेदन सुपूर्द करणार



असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले असून हे काम वर्षभरापासून न करणाऱ्या नळगे इन्फ्रास्ट्रक्चर या गुत्तेदार कंपनीवर वर कठोर कारवाई करत पुनश्च निविदा मागवून नवीन कंपनीला काम देऊन पूर्ण करण्यात यावे अशी मागणी सावरगाव येथील नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे या संदर्भात वेळोवेळी उपकार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्या कानावर घालूनही सदरील गुत्तेदाराने हे काम करण्यासाठी हायगय केलेली असून, या प्रकरणी अधीक्षक अभियंता यांनी कार्यवाही करावी नसता आम्ही सर्व गावकरी कंत्राटदार कंपनीच्या विरोधात उपोषणास बसणार असून या कंपनीने परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक बोगस कामे केली असल्याचे ही गावकऱ्यांचे म्हणणे आहे याबाबतीत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले असून सदरील प्रकरणी कार्यवाही न झाल्यास कार्यकारी अभियंता यांच्या दालनासमोर उपोषणास बसणार असल्याचा इशारा खालील गावकऱ्यांनी दिलेला आहे उद्धव गुंजाळ (संचालककृषी उत्पन्न बाजार समिती) नवनाथायंदे (सरपंच), कुंडलिक राऊत (उपसरपंच) ,विठ्ठल महाराज तौर,माऊली तौर समाधान तौर,रघुनाथ तौर,योगेश तौर,बालासाहेब जाधव .जगन्नाथ रासवे ,भाऊसाहेब मोरे,प्रल्हाद इंगोले ,उद्धव शिंदे,महिंद्र गुंजाळ, गोविंद तौर यांच्या सह अनेकांनी मागणी केली आहे.

# दादरच्या दत्ता राऊळ मैदानात रंगणार कबड्डीचे सामने

## " बाळासाहेब ठाकरे चषक" - कबड्डी एक ध्यास ! एक श्वास !

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - राकेश रमेश पाटील.**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना प्रेरीत होवून ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण याला अनुसरून शिवसेना नेहमीच खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी अग्रेसर असते.




यावर्षी शाखा क्र. १९१ चे शाखाप्रमुख श्री. अजय कुसम यांच्या वतीने विजय बजरंग क्रिडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने " बाळासाहेब ठाकरे चषक" कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. यात युवा खेळाडूंसाठी स्थानिक 'ब' गट तसेच ४५ वर्षावरील नामवंत कबड्डी खेळाडुंच्या कबड्डीचे सामने रंगणार आहेत. या कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ रविवार दि. १३ एप्रिल २०२५ रोजी मा. खासदार श्री. राहुल शेवाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. आमदार श्री. सदा सरवणकर, मा. नगरसेवक श्री. समाधान सदा सरवणकर महिला विभागप्रमुख सौ. प्रिया गुरव – सरवणकर, विभाग प्रमुख निशिकांत पाठारे शाखा प्रमुख अभिजीत राणे व इतर सर्व महिला व पुरुष पदाधिकारी उपस्थित होते.

सदर कबड्डी स्पर्धा रविवार दि. १३ एप्रिल २०२५ ते रविवार दि. २० एप्रिल पर्यंत सुरू राहणार आहे.

# सचिन वैद्य यांना २०२५ चा महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मान

## विविध क्षेत्रातील 88 नामवंत व्यक्तींना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

चंद्रपूर मध्ये वर्धा जिल्ह्यामधील देवळी गावातील एका सर्व सामान्य व्यक्तीचा सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये अविरत कार्य करीत असलेले सचिन निर्मला जगनराव वैद्य यांचा कर्तुत्व , कार्याचा गुणगौरव झाला. या कार्यक्रमाचे आयोजक दर्पण पत्रकार आणि संपादक फाउंडेशन रेल यात्री एकदम मजूर संघ आणि जागतिक मानव अधिकार आणि माहिती हक्क संघटनेच्या वतीने महाराष्ट्र रत्न पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते अभिलाषा गावतुरे , अभिनेत्री श्रीपा तेलंगे , सिध्दीकी बँकेचे अध्यक्ष संतोष रावतकर , इंडिया २४ संपादक तुळशीराम जांभुळकर हे उपस्थित होते. जेहोवा अर्बन बँकेचे अध्यक्ष सचिन पानघाटे , दैनिक नवराष्ट्र प्रतिनिधी प्रशांत विघ्नेश्वर , टाइम्स ऑफ इंडियाचे प्रतिनिधी मजहर अली , दैनिक महाविदर्भाच्या संपादक कल्पना पालीकुंडलवार उपस्थित होते. आमदार सुधीर मुनगंटीवार



आणि आमदार किशोर जोरगेवार यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या पुरस्कार विजेती त्रिशाली चौधरी , चंदाताई कमलाकर , सतीश पारधी , विशाल वानखेडे , सोमय्या अली , सचिन वैद्य , कल्पक कांबळे भूमेश्वरी रहांगाडाळे गोंदिया , संदीप बाणेवार , सोनल शेंडे गोंदिया , देवयानी लोखंडे , गोंदिया लोखंडे , बालाघाट गोंदिया येथील डॉ. हरीश खत्री , मनोज ससाने , बुलढाणा येथील राजेंद्र ससाने आरीफ पटेल, बाबू क्रेशी , मेरी विल्सन , वडसा येथील प्रल्हाद मेश्राम , वाशिम येथील श्रद्धा काकड आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजित दर्पण जनरलीस्ट अँड एडिटर्स फाउंडेशनचे संपादक सुशीलकुमार पांडे , मानव अधिकार राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र पाठक , रेल यात्री एकता मजदुर संघाचे नंदगोपाल पांडे , दर्पण जनरलिस्ट फाउंडेशनचे सहसचिव सचिन लिमसे पोलीस टाईम्स २४ इनहोन समाजाच्या पत्रकार योगिता पाटेकर होते. तर क्रीडा , सामाजिक , पत्रकारिता , कला , आरोग्य , पोलीस आणि इतर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच महाराष्ट्र रत्नांना समाजातील अनेकांकडून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत यापुढेही जोमाने आपले कार्य , काम कराल. अशी अपेक्षा व्यक्त केली.

## माहेर महिला प्रतिष्ठानच्या वतीने चिरनेर येथील आश्रम शाळेतील मुलांना शाळेय उपयुक्त साहित्य वाटप !!

**पान १ वरुन** फुळे व ज्योतिमय बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिष्ठान तर्फे मुलांना पुस्तकांची पेढी देण्याचे ठरवले."वाचाल तर वाचाल " या उक्ती नुसार मुलांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी या आदेशाने साहित्यिक गोष्टी प्रेरणादायी पुस्तके,थोर विचारवंत छत्रपती शिवाजी महाराज,भगवद्त गीता,ज्ञानेश्वरी यासारखी संस्कारमय पुस्तके देण्याचे ठरवले.चिरनेर येथील अनाथ आश्रमशाळेचे मुख्याध्यापक मोरे यांच्या मागणी नुसार तसेच विंधणे येथील रमाबाई आंबेडकर आश्रमशाळेत प्रोजेक्टर व गणवेशाचे वाटत करण्यात येणार आहे. यावेळी एकल पालकत्व असलेल्या महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या दुष्टीने महिलांना होमकेअर प्रॉडक्टसचे प्रशिक्षण देऊन त्यांनी बनवलेल्या वस्तूंना बाजारपेठही मिळवूनही देणार आहेत.सिडको सामाजिक पुनर्वसनचे मुख्य अधिकारी पळशीकर उपस्थित राहणार आहेत असे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विद्याताई म्हात्रे यांनी आमच्या प्रतिनिधीं जवळ बोलताना सांगितले.

# नागरी संरक्षण दल उरण व नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल उरण

## यांच्या संयुक्तविद्यमाने अग्निशमन सेवा दिन सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवकआधार**
**उरण प्रतिनिधी/सायली साळुंके**

14 एप्रिल हा दिवस देशभरात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या 66 अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या स्मरणार्थ अग्निशमन सेवा दिन म्हणून सप्ताह साजरा केला जातो, यानित्ताने त्यांच्या स्मरणार्थ परेड आयोजित केली जाते. 14 एप्रिल1944 मध्ये मुंबई गोदीत एका मालवाहू जहाजावर झालेल्या दारूगोळ्याच्या स्पोटात हे अग्निशमन दलाचे जवान शहीद झाले होते,या दिनाचे औचित्य साधून रायगड-उरण येथिल नागरी संरक्षण दलव उरण मधील नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलयांच्या संयुक्तविद्यमाने या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. नागरी संरक्षणदलाच्या भव्य प्रांगणात संपन्न झालेल्या अग्निशमन सेवा दिन



सप्ताह उपक्रमा करिता उपनियंत्रक शशिकांत सिरसाठ,मुख्य क्षेत्ररक्षक नवीन राजपाल,उपमुख्य क्षेत्ररक्षक दत्ताराम गोंधळी,विभागीय क्षेत्ररक्षक हरेश्वर ठाकूर,स्वयंसेवक मिथुन म्हात्रे,समीर थळी,अभिमन्यू गोवारी,कल्पेश म्हात्रे,नितेश घरत,सौ.तेजश्री थळी,सौ.स्वाती म्हात्रे,प्रणीत म्हात्रे,यांच्या बरोबर स्कूलच्या प्रिन्सिपॉल सौ.ज्योती म्हात्रे,जेष्ठपत्रकार प्रदीप पाटील,स्कूलमधील शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या अग्निशमन सेवा दिन सप्ताहचे औपचारिक उद्घाटनजेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले,यावेळी उपनियंत्रक शशिकांत शिरसाठ साहेबांनी हा दिन का साजरा केला जातोयाची सविस्तरपणे माहीत सांगितली या सप्ताहाचे महत्व समजून सांगितले,त्यानंतर याप्रसंगात घाबरून नजाताआपण स्वतःचा बचावकसा केरू शकतो त्याच बरोबर आपण इतरानाही कोणत्या प्रकारे मदत करू शकतो याची संपूर्ण माहिती देऊन विद्यार्थी व शिक्षकांनी याची प्रात्यक्षिके सादर केली.लहान विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर प्रकारे प्रात्यक्षिके सादर केली यावेळी प्रायोगिक लावण्यात आलेल्या आगीच्या प्रात्यक्षिकामध्ये ती विझविण्यात विद्यार्थांसह शाळेच्या प्रिन्सिपॉल सौ.ज्योती म्हात्रे, शिक्षिका शिल्पा मॅडम,आरती सुरवसे मॅडम यांनी आपला सहभाग दर्शविला, शेवटी जेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील यांनी14 एप्रिल 1944च्या घटनेची माहिती सविस्तरपणे सांगून आपल्या उरणमधील संभवित अग्निकांडाच्या संकेतस्थळा विषयी सविस्तरपणे माहिती विषद केली व शासनाने आता प्रत्येक शाळेमधून विद्यार्थ्यांना नागरी संरक्षणा बाबत पाठ्यक्रम असणे गरजेचे असल्याचे अधोरेखित केले.शेवटी नागरी संरक्षण दलाच्या सर्व अधिकारी व उपस्थित कर्मचारीआणि स्वयंसेवकांचे आभार मानले

# माझ्या जीवनाचा मीच शिल्पकार

## स्वत :च्या जीवनासाठी व दुसऱ्याच्या जीवनासाठी पुरोगामी विचाराने केलेले कार्य

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजितसिंग ठाकूर**

वाकद येथील प्रयोगशील शेतकरी कुंदनसिंह ठाकूर व विलास मोरे ठरले जलताराचे दूत
*वाकद येथील एकाच शेतकरी कुटुंबाने केले 22 जलतारा गड्डे, केले होते त्यामध्ये
*श्री कुंदनसिंह प्रेमसिंह ठाकूर व श्री लखनसिंह ठाकूर संतोषसिंह ठाकूर व विलास पांडुरंग मोरे

यांनी मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस यांच्या संकल्पनेतून तयार झालेला ड्रीम प्रोजेक्ट ला जिल्ह्यामध्ये चालना देण्याकरिता आपल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांनी पाणीटंचाई, पाणी समस्या, दुष्काळ यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जमिनीत पाण्याचा संचय करणे पाण्याचे पुनर्भरण करणे यासाठी वाशिम जिल्ह्यामध्ये *जलतारा* प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे त्याचाच एक भाग म्हणून माननीय उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर मॅडम व रिसोडच्या माननीय तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाकद येथील मंडळ अधिकारी श्री ए व्ही लहाने व तलाठी श्री जी जी गरकळ व तलाठी श्री अक्षय जाधव यांनी मागील काही




दिवसापासून सतत पाठपुरावा करून वाकद येथील शेतकऱ्यांना स्वखर्चातून स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन आपल्या शेतामध्ये जलतारा योजनाचा लाभ घेण्यासाठी प्रेरित केले त्याचाच एक भाग म्हणून आज वाकद येथील प्रगतशील शेतकरी श्री कुंदनसिंह प्रेमसिंह ठाकूर व लखनसिंह ठाकूर संतोष सिंह ठाकुर व विलास पांडुरंग मोरे यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या वाकद येथिल शेतजमिनीमध्ये जलताराचे 22 खड्डे पूर्ण केले असून अजूनही उर्वरित ज माननीय जिल्हाधिकारी वाशिम, माननीय उपविभागीय अधिकारी वाशिम यांनी जलतारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्याना आपल्या शेतात एकूण एका एकरासाठी एक याप्रमाणे उताराच्या दिशेने शेतात ज्या ठिकाणी पाणी साचते अशा ठिकाणी पाच बाय पाच फूट लांबी रुंदी व सहा फूट खोली असलेले खड्डे खोदकाम करून त्यामध्ये मोठे मध्यम व छोट्या आकाराचे दगड भरून हे खड्डे भरून घ्यावे आणि त्यामुळे पावसाळ्यात पावसाचे वाहणारे व गाळ वाहून नेणारे पाणी अशा ठिकाणी थोपून ते जमिनीमध्ये जिरवले जाईल यामधून "पाणी अडवा पाणी जिरवा" संकल्पना पूर्णत्वास जाईल "जल है तो कल है" असे आपण म्हणतो परंतु खरे म्हणजे अशाप्रकारे ग्रामपातळीवर प्रत्यक्ष शेतकऱ्यांसोबत हात मिळवणी केल्याशिवाय शासनाचे हे काम पूर्णत्वास जाणार नाही आपल्या राज्याचे सिंचनाचे शिल्पकार विकास पुरुष कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सुरुवात केलेला स्तुत्य उपक्रम या योजनेमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांना ज्यांच्याकडे जॉब कार्ड आहे किंवा जे इतर जॉब कार्ड धारकामार्फत काम करून घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी जवळपास 5000 रुपयांपर्यंतचे अनुदान रोजगार हमी योजनेअंतर्गत देय आहे तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच आपल्या गावातील व आपल्या परिसरातील मोठ्या शेतकऱ्यांनी हाच आदर्श घेऊन स्वयंस्फूर्तीने व स्वखर्चाने आपल्या शेतात जलतारांची निर्मिती करावी जेणेकरून भविष्यात सिंचनातून प्रगतीकडे प्रत्येक शेतकरी हा जायला पाहिजे व प्रत्येक शेतकऱ्याला जलतारा योजनेचा फायदा व्हायला पाहिजे त्याकरिता सर्वांनी आपल्या आपल्या शेतामध्ये ही योजना राबवावी व जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यापासून प्रेरणा मिळावी हाच उद्धात हेतू समोर ठेवून आज जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे जिल्हाधिकारी एस भुनेश्वरी महोदया उपजिल्हाधिकारी घुगे , एस डी ओ वैशाली देवकर मॅडम साहेब तथा तालुका दंडाधिकारी प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांच्या हस्ते श्री कुंदनसिंह ठाकूर व विलास मोरे यांचा सत्कार करण्यात आला,

# स्वत:सोबत देशाचा विकास साधणारे छंद विद्यार्थ्यांनी जपावेत....

**रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील**

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

शासनाच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जात आहेत. उरणातील सुप्रसिद्ध विद्यालय असलेल्या एन.आय. हायस्कूलमध्ये प्राचार्य भोये यांनी विविध उपक्रम सुरु केले आहेत. त्यापैकी छंद या विषयावर कविसंमेलन घेतले असता आपले विचार अध्यक्षपदावरून चिार मांडताना रायगडभूषण प्रा एल बी पाटील म्हणाले की आपण आपला वैयक्तिक स्वार्थ न पाहता देशाच्या हितासाठी छंद सांभाळत जावे.यावेळी प्रा एल.बींनी विनोदी कविता आणि आगरी बोलीमध्ये पसायदान सादर केले.प्राचार्य भोये यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले.सूत्रसंचालन आर.ए.खेडकर यांनी सुरेख केले. कोमसाप उरणचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, कोमसाप सचिव अजय शिवकर, ज्येष्ठ कवी अनिल भोईर,बी एस.गायकवाड, करमाडेसर, आदर्श शिक्षक संजीव पाटील यांनी मार्गदर्शन करणा-या कविता सादर केल्या विद्यार्थ्यांमध्ये"आई" या विषयावर अनामिका राम, " कष्ट " तेजस्विनी गायकवाड,"पाऊस " स्वेता बोलके,"चल रे भोपळ्या "श्रेया पटवर्धन,"विश्वास" सपना शर्मा यांनी सादर केलेल्या कवितांनी ज्येष्ठ कवी प्रमाणेच विद्यार्थ्यांना





आनंद दिला. या प्रसंगी रायगडभूषण प्रा. एल.बींनी " नफरत v/s मोहोब्बत" आणि मच्छिंद्र म्हात्रे यांनी " कवितांची विशेष पुरवणी" यांची भेट हायस्कूलच्या वाचनालयाला दिली. पर्यवेक्षिका एस.एस.पेंडसे, क्रेडिट सो.अध्यक्षा दिपाली म्हात्रे,एक.टी.जाधव,आर.एल. चौधरी,तडवी,यांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आभार कर्मचारी संघाचे अध्यक्ष एस.जी.पाटील यांनी मानले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# श्री प दि जैन विद्यालय अनसिंग येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वि जयंती साजरी.

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**

जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाची सर्वसमावेशक राज्यघटना लिहून देशाला सक्षम बनवण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण मोठ्या कठीण प्रसंगातून पार पडले. शिका आणि संघटित व्हा संघर्ष करा. असा मूलमंत्र त्यांनी सामान्य जनतेला दिला. शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे कोणत्याही समाजावर भेदभाव न करता आरक्षण देऊन समाजाचा डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सन्मान केला. श्री प दि जैन विद्यालय अनसिंग येथे जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती उन्होने, ह्या होत्या. तर प्रमुख अतिथी पर्यवेक्षक संजय वैद्य, प्रमुख वक्ते डी के चव्हाण, श्री गजानन इंगळे सर, शिक्षक समिती प्राथमिकचे शिक्षक मारुती दंडे, हे उपस्थित होते. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक देविदास बल्लाळ, एम एम मुसळे, विष्णू चौरे, प्रताप कापणे, राम वराडे, विशाल इंगळे, शंकरराव गीते, तसेच शिक्षक के तर कर्मचारी, सुहास वाळली, उदय वाळली, प्रीती वाळली, सुशांत भुरे, गंगाराम ढगे, तानाजी शिंदे, साहेबराव खंडारे, रोहिदास राठोड, तसेच शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आचार विचार आजच्या युवापिढीने आत्मसात करावे. प्रा. संजय मोरे.

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर**
**मुंबई प्रतिनिधी प्रमुख**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या.जयंती निमित्त निंभोरा येथील कृषि विद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्तीसेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षी प्रल्हादभाऊ बोडे हे होते. तर विशेष प्रमुख अतिथी प्रा संजय मोरे अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा भाजपा अनुजाती मोर्चा म. सचिव हे होते. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला प्रल्हाद बोडे आणि प्रा. संजय मोरे सामुहिकरित्या यांनी पुष्पहार अर्पण केला. त्या प्रसंगी प्रा. संजय मोरे यांनी सांगितले कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे जनक







असुन भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान असुन या संविधानाचे भौतिक स्वरूप म्हणजे त्याचे आकारमन एका मोठया पुस्तका सारखे असुन त्यांची लांबी 32.5 तर रुदी 22 से.मी. इतकी असुन त्याचे वजन 13 किलो इतके आहे.1950 मुळ संविधान दिल्लीतील संसद ग्रंथालंय इमारतीत नायट्रोजनने भरलेल्या पेटीत जतम केले आहे. संविधान सभेने 2वर्ष 11महिने 18 दिवस इतका कालावधी मसुदा समितीला लागला. संविधान 26नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारले तर 26जानेवारी 1950 रोजी अंमलात येऊन ते लागु करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जगात सर्वात जास्त पुतळे असुन त्यांची दिवसेंनदिवशी संख्या वाढत असुन भारतातील सर्वात उंचीचा पुतळा विजयवाडा ( आंध्रप्रदेश )हा पुतळा 125 फुट उंचीचा असुन 81 फुट उंचीच्या चौथाऱ्या सह त्यांची 206 फुट आहे. सर्व महाराष्ट्र राज्यात लातुर येथील डॉ. आंबेडकर पार्क येथे 72 फुट उंचीचा आहे.संविधान धर्मनिरपेक्ष असुन कोणत्याही विशिष्ट धर्माला प्राधान्य दिले जात नाही.संविधान नागरिकांच्या न्याय समानता बंधुत्व सामाजिक आर्थिक न्यायासाठी प्रयत्न करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक विद्याभुषीत महामानव असुन त्यांचे महान विचार आत्मसात करून स्वतःचे गांवाचे जिल्हाचे महाराष्ट्र राज्याचे व आपल्या देशाचे कल्याण व्हावे. या दिशेने युवकांनी वाटचाल करावी असे प्रा. संजय मोरे यांनी सांगीतले. त्या प्रसंगी प्रल्हाद बोडे डॉ. एस. डी. चौधरी श्रीराम प्रभु संस्थांनाचे अध्यक्ष अनिल बऱ्हाटे उपप्राचार्य विवेक बोडे डॉ. धनराज बावस्कर अतुल मोरे यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपासक उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक बोडे यांनी केले तर आभार डॉ. धनराज भावस्कर यांनी मानले.
आपला विश्वासु डॉ. धनराज भावस्कर.

# राज्य स्थरीय मंथन स्पर्धा परीक्षेत कार्तिक चांदोरकर याने केले यश संपादन.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव रायगड**



**माणगांव** :- माणगाव तालुक्यातील चांदोरे येथील रहिवासी तसेच र. का. गांधी प्राथमिक विद्यामंदिर गोरेगाव येथे इयत्ता दुसरीत शिक्षण घेत असतांना मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित करण्याचे विद्यालयातील शिक्षकांचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि गणिताची आवड निर्माण करणे आणि त्यांचे कौशल्य ओळखणे हे आहे.विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षा ही परीक्षा दरवर्षी घेतली जाते.
विज्ञान आणि गणिताशी संबंधित विषयांमध्ये रस असलेल्या विद्यार्थ्यांना ओळखण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते.पत्रकार नंदकुमार चांदोरकर यांनी आपल्या मुलामध्ये हेच कौशल्य ओळखून दर वर्षी मंथन परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून देत असतात. भविष्यातील अनेक स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी ही परीक्षा घेतली जाते या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची पातळी आणि दर्जा ओळखला जातो कु. कार्तिक नंदकुमार चांदोरकर याने मंथन राज्यस्थरीय स्पर्धा परीक्षेत २०२५ पास होऊन राज्यात २० वा नंबर, जिल्यात १५ वा तर केंद्रात ३ रा नंबर काढून चांदोरे रोहिदासवाडीचे नावं उंचावले आहे.गेल्यावर्षी मंथन जनरल नॉलेज स्पर्धा परीक्षेत सुद्धा राज्यात उत्तम प्रकारे यश संपादन केले होते

# पर्यवेक्षक जयवंत ठाकरे सर यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

चांदोरी : येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयाचे पर्यवेक्षक जयवंत निंबाजी ठाकरे यांना नुकतीच वर्ल्ड कल्चर अँड एन्व्हायरमेंट प्रोटेक्शन कमिशन तर्फे ऑनररी डॉक्टरेट ही पदवी बहाल करण्यात आली. अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब कापडणीस यांनी दिली. पर्यवेक्षक ठाकरे सर हे संपूर्ण नाशिक जिल्ह्यात सृष्टी मित्र म्हणून प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्र शासनाचा २०१८ चा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार ठाकरे सरांना मिळाला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभागाचा सृष्टी मित्र पुरस्कार, रयत शिक्षण संस्थेचा आदर्श समजला जाणारा यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार, राज्यस्तरीय इनोवेशन टीचर्स अवॉर्ड, महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय शोधनिबंध पुरस्कार विजेते, राष्ट्रीय शिखर सन्मान पुरस्कार, वोडाफोन राष्ट्रीय एक लाख रुपयांची शिष्यवृत्ती,WCEPC तर्फे डॉक्टरेट पदवी मिळविणारे जयवंत निंबाजी ठाकरे हे रयत शिक्षण संस्थेचे आजीव सभासद देखील आहेत. रयत शिक्षण संस्थेचा नाशिक जिल्ह्यातील एक आदर्श शिक्षक, पर्यावरणवादी जनजागृती करणारे निसर्गप्रेमी व्यक्तिमत्व, संवेदनशील मनाचा माणूस म्हणून ठाकरे सरांची संपूर्ण नाशिक जिल्ह्यात व रयत शिक्षण संस्थेत ओळख आहे. त्यांचे सामाजिक भान व जागृती यामुळे त्यांना विविध संस्थांचे व संघटनांचे देखील पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयात ते पर्यवेक्षक या पदावर कार्यरत आहेत. वर्ल्ड कल्चर अँड एन्व्हायरमेंट प्रोटेक्शन कमिशन तर्फे ऑनररी डॉक्टरेट ही पदवी ठाकरे सरांना मिळाल्यामुळे चांदोरी आणि पंचक्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथ काका शिंदे, विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे सदस्य माणिक शेठ गायखे,जनरल बॉडी सदस्य डॉक्टर सुजितजी गुंजाळ, लाईफ मेंबर आर के चांदे सर, विंचूर गटाचे गटप्रमुख प्राचार्य नंदकुमार देवढे तसेच विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब कापडणीस, उपमुख्याध्यापिका सौ संगीता भदाणे, पर्यवेक्षक मनोज महाजन, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी जयवंत ठाकरे सरांचे अभिनंदन केले आहे.




# आत्महत्या नव्हे तर ही एक सरकारच्या अपयशाचा बळी आहे - खा.रविंद्र वसंतरावा चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** : पाटोदा थडी ता.धर्माबाद जिल्हा नांदेड येथील हरिदास विश्वंभर बोंबले हा शेतकरी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा कुंडलवाडी यांच्या कर्ज वसुलीला कंटाळून फाशी घेऊन आत्महत्या केली. सतत ची नापिकीमुळे,ओला दुष्काळ तर कधी कोरड दुष्काळ निसर्गाचा लहरीपणा, मालाला कमी बाजारभाव म्हणजे शेतकरीची आर्थिक मंदी, रोजगार उपलब्ध होत नाहीत.लाडकी बहिण योजना देउन सरकार लोकांना निवडणुकीच्या प्रचारार्थ भलत्याच थापा देऊन कर्जमाफीच आश्वासन दिले पण आश्वासन पूर्ण करताना मात्र नरडीचा घोट वसुलीनामा सरकार करीत आहेत सरकार कर्जमाफी करतो म्हणून निवडून येते आणि शेतकऱ्यांना आत्महत्या करावे लागतात यापेक्षा दुर्दैव कोणते बँकेच्या सततच्या रेट्यामुळे या शेतकऱ्याला आपली जीवनगाथा संपवावी लागली या शेतकऱ्याप्रती भावना व्यक्त करताना या निष्क्रिय सरकारचा खासदारांनी जाहीर निषेध केला आणि कुटुंबातील सर्व सदस्यांना धीर देऊन शासकीय मदतीच्या पाठपुराव्या संदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली यावेळी धर्माबाद तालुक्यातील सर्व काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ मंडळी गावातील सर्वश्रेष्ठ युवक वर्ग शेतकरी कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे एपीआय शिंदे साहेब महसूल अधिकारी ग्रामसेवक तलाठी उपस्थित होते.



# पारडगाव येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीस गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यावर कार्यवाहीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा प्रतिनिधी:- रमेश सुरशे**

**(छत्रपती संभाजीनगर):-** घनसावंगी तालुक्यातील पारडगांव येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती प्रसंगी प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी गैरहजर असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते सुनील सुतार यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना या ठिकाणी केली आहे.14 एप्रिल महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.मात्र पारडगाव येथील प्रशासकीय कार्यालयामध्ये उदासीनता दिसून आली त्यामुळे असल्या कामचोर कर्मचाऱ्यावर व अधिकाऱ्यावर तीव्र संताप व्यक्त करत कायदेशीर कार्यवाहीची मागणी होत आहे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची व सर्वच महापुरुष याची जयंती ही शासकीय कार्यालयामध्ये साजरी करण्यात यावी.असा शासन निर्णय असतानाही गावातील प्रशासकीय अधिकारी जसे ग्रामविकास अधिकारी तलाठी,आरोग्यसेवक, अंगणवाडी कार्यकर्ती,मदतनीस, जिल्हा परिषद उर्दु शाळेचे शिक्षक यांनी जाणून-बुजून काल झालेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीस अनुपस्थिती दर्शवली आहे. तसेच सेवा बजावत असलेल्या ठिकाणी निवासी राहण्याचा शासनाचा निर्णय असूनही कोणताही प्रशासकीय अधिकारी अथवा कर्मचारी निवासी राहत नसल्याचे दिसून आले आहे त्यामुळे अधिकाऱ्यांना त्यांचे कर्तव्याची जाणीव नसेल तर अशा अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची मागणी ही सुनील सुतार यांनी जिल्हाधिकारी,व जिल्हा परिषद यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.अन्यथा सेक्युलर रिपब्लिकन फेडरेशन ऑफ इंडिया या सामाजिक संघटनेतर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# पी एम श्री रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुळेखंड येथील विद्यार्थ्यांनी बैलगाडीतून केला शाळा प्रवेशोत्सव

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड.**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात पीएमश्री रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुळेखंड या शाळेतील नवागतानी तसेच सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी मुळेखंड फाटा ते साईबाबा मंदिर परत मुळेखंड शाळा अशी मिरवणूक काढून या वर्षात शाळेत दाखल होणाऱ्या सर्व नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी प्राथमिक मा सुनीलजी भोपळे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सुरुवातीला मुळेखंड फाटा येथे ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष मा प्रकाश पाटील व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य महेश म्हात्रे यांनी बैलगाडीला पुष्पहार घालून सुरुवात झाली नवागत मुलांना डोक्यात टोप्या, पुष्पगुच्छ देऊन त्यांना नाविन्यपूर्ण सजवलेल्या बैलगाडीत बसवून त्यांच्यापुढे लेझीम व ढोल ताशावर वाजत गाजत अशी ही मिरवणूक काढण्यात आली. मराठी शाळेच्या मुलांचीही आगळीवेगळी मिरवणूक पाहण्यासाठी अनेक पालक, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सहभागी झाले होते.सहा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना मराठी शाळेत इयत्ता पहिलीमध्यै मोफत प्रवेश सुरू असून ही तालुक्यातील एकमेव पी.एम.श्री शाळा आहे शाळेचा परिसर, रंगरंगोटी सजावट व सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक कार्यतत्पर असून या शाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना दाखल करावे. असे आवाहन करण्यात येत आहे आजच्या या कार्यक्रमात जवळजवळ नवागत विद्यार्थी म्हणून १५ विद्यार्थी सहभागी झाले होते. निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत व NEP २०२० मार्गदर्शक सुचनांचे पालन करून या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली आहे.असे मत शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन उपक्रमशिल शिक्षक .संजय होळकर सर.दिशा तांडेल मॅडम.अर्चना पाटील मॅडम चारही अंगणवाडीताई यांनी केले होते. या उपक्रमात गावातील समाजसेवक .नरेंद्र म्हात्रे, .लांगी चाणजेफाटा,.प्रशांत कोळी सर,सर्व पालकवर्ग उपस्थित होते.






# सुवर्ण भरारी बहुउद्देशीय संस्थेच्या कन्नड तालुका अध्यक्षपदी सतीश लोखंडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**-छत्रपती संभाजीनगर**



स्ववर्ण भरारी बहुउद्देशीय संस्था (अन्याय अत्याचार भष्टाचार निवारण समिती) च्या कोअर कमिटीच्या बैठकीत झालेल्या निर्णयात सतीश लोखंडे यांची कन्नड तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. डॉ. सारीका ताई नांगरे (संस्थापक अध्यक्षा) सुवर्ण भरारी बहुउद्देशीय संस्था व संदीपजी मानकर (प्रदेश सरचिटणीस) यांच्या आदेशावरून व संजय तळेकर संतोष दादा सोनार यांच्या संपर्कातून माहितीनुसार निवड करण्यात आली.श्री सतिश लोखंडे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते यांची मोलाची कामगिरी सामाजिक राजकीय सांस्कृतिक शैक्षणिक योगदान व एकनिष्ठा त्यांनी आजपर्यंत समाजासाठी केलेले कर्तव्यनिष्ठ कामगिरी व समाजातील भक्कम असे पकड पाहता यांचे कोर कमिटीने नियुक्ती जाहीर केले आहे. दतात्रेय दहीवाल महाराज , दत्तात्रेय मैड साहेब ,संदीपजी मानकर , श्रीराम भाऊ उतेकर , रवि माळवे प्रसिद्ध प्रमुख , राजेंद्र कुलथे पुणे जिल्हा अध्यक्ष, श्रीमती भाग्यश्रीताई पाटील नाशिक जिल्हा अध्यक्ष , व सर्व सुवर्ण भरारी बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# केकतउमरा येथे जय भीम पदयात्रा उत्साहात

## नेहरू युवा केंद्र , जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा बहुउद्देशीम मंडळाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**

वाशिम इथून जवळ असलेल्या ग्राम केकतउमरा येथे आज दिनांक 16.एप्रिल 2025 रोजी, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार, नेहरू युवा केंद्र व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ केकतउमरा यांच्या वतीने विकसित भारताच्या उभारणीसाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, न्याय आणि बंधुत्वाच्या दृष्टिकोनातून प्रेरणा घेण्याचं आवाहन केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी केले असता. आदेशाप्रमाणे "जय भीम पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला नेहरू युवा केंद्राचे माजी राष्ट्रीय युवा स्कोर प्रवीण




पट्टेबहादुर, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आर्चरी असोसिएशनचे सचिव अनिल थडकर,जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा केकतउमरा मुख्याध्यापक श्री.राम वाणी, जिल्हा युवा पुरस्कारार्थी प्रदिप पट्टेबहादूर डॉ.दीपक तडस यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हारारपण अभिवादन करून. या रॅलीला हिरवी झेंडी दिली. या रॅलीची सुरुवात सकाळी ७ : ०० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ग्रामपंचायत परिसर येथून करण्यात आली होती. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी, विठाबाई पसारकर विद्यामंदिर केकतउमरा, नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळाचे स्वयंसेवक, राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था प्रतिनिधी,व गावातील नागरिकांचा सहभाग या रॅलीमध्ये लाभला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी हातामध्ये पोस्टर फलक घेऊन गावामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व संविधानांचा जागर करीत घोषणा दिल्या. गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून या जय भीम पदयात्रेतून अभिवादन केले. या पदयात्रेला जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक शिवाजी पोटे, सुरेश गोटे,दिलीप शिंदे ,विष्णुदास शिंदे, अरुण इंगोले, गणेश गोटे,संजय साबळे, सुभाष काकडे , विठाबाई पसारकर विद्यामंदिर केकतउमरा मुख्याध्यापिका सौ .हर्षा पसारकर, आर.डी गायकवाड, अभिजीत पसारकर, किसन वाकुडकर, सारंग पसारकर, भारती डोंगरे, संध्या पसारकर, यांची उपस्थित होती या पदयात्रेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा युवा पुरस्कारार्थी महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष नेहरू युवा बहुउद्देश्य मंडळ,नेहरू युवा केंद्र मा.स्वयंसेवक दत्ता मोहोळे, नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळाचे स्वयंसेवक पवन हरीमकर, दीपक पट्टेबहादूर,संदीप कांबळे, तुकाराम चव्हाण, अंगणवाडी सेविका अशा सेविका व गावातील नागरिकांचा मोठा सहभाग लाभला होता. सदर कार्यक्रम हा नेहरू युवा केंद्र जिल्हा युवा अधिकारी आशिष पंत, व जिल्हा क्रीडा अधिकारी लता गुप्ता मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या "जय भीम पदयात्रेला" राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्थेचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप पट्टेबहादूर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण पट्टेबहादूर यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार शिक्षक शिवाजी पोटे यांनी मानले.

# आबासाहेब खिलारे यांना राज्य शासनाचा आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**आष्टी :प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**



आष्टी तालुक्यातील कडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांना महाराष्ट्र शासनाचा सन २०२२-२३ चा राज्यस्तरीय आदर्श ग्रामविकास अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.बीड जिल्ह्यातून हा एकमेव पुरस्कार मिळाला आहे. जिल्हा परिषद स्तरावर अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना शासन स्तरावरून यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार देऊन दरवर्षी गौरविण्यात येते. गेल्या दोन वर्षापासून या पुरस्काराचे वितरण झाले नव्हते. यावर्षी 2022-23 चा आदर्श ग्राम विकास अधिकारी पुरस्कार कडा येथील ग्राम विकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांना जाहीर करण्यात आला आहे. आबासाहेब खिलारे यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करताना गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले आहेत. कडा हे शहर स्मार्ट ग्राम करण्यामध्ये खिलारे यांचा मोलाचा वाटा होता. यामध्ये सार्वजनिक उद्यान ,बॅडमिंटन हॉलची उभारणी, वॉकिंग ट्रॅक ,ओपन जिम, उभारण्यात आले. ओला कचरा व शेणा पासून गॅस निर्मिती करण्यासाठी गोबरधन प्रकल्प तयार करण्यात आले. सांडपाण्याची दूरदृष्टी ठेवून पहिल्यापासून भूमिगत नालीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर काम केले. याशिवाय वृक्ष लागवड व संगोपनाची जबाबदारी ,गावांतर्गत सफाई डासमुक्त अभियान, राष्ट्रीय सेवा योजनेचे आयोजन करणे, महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे, व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी कडा शहरांमध्ये खेळाच्या सुविधा तयार करून देणे इत्यादी महत्त्वाच्या बाबी त्यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून पार पाडल्या. या कामाची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी हा पुरस्कार जाहीर केला आहे. त्यांच्या या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अधिकारी, एजंट व शेतकऱ्यांची युक्ती ; मोबदल्याच्या लाभासाठी कलमी झाडांची लागवड शुद्ध हेतूने वृक्ष लागवड न करता शासनाकडून पैसे उकळण्याची भणाट युक्ती

**दैनिक युवक आधार**
**खालापूर:- वार्ताहर**


भविष्यातील दळणवळणाच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी सरकारने अनेक कर्ज घेतले जात आहे व ते सर्व कर्ज महागाई च्या स्वरूपात सर्वसामान्य जनतेच्या कडून वसूल केले जाणार असल्याने ,आपला कर हा चुकीच्या पद्धतीने शासना कडून वापरला जाऊ नये यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी निर्भीड पणे जवाबदार नागरीक म्हणून सतर्क व जागृत राहून असे प्रकार सरकारच्या निर्देशनात आणले पाहिजेल. मात्र तसे होताना दिसत नाही. खालापूर तालुक्यात राज्य सरकारकडून नवीन रस्ते महामार्ग नियोजनाच्या माध्यमातून अनेक गावाखेड्यातून सर्वेक्षण केले जात आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी नवीन होणाऱ्या रस्त्यात जात असल्याने राज्य सरकारकडून त्या मोबदल्यात शेतकऱ्यांना ठरलेल्या जागेचा पंचनामा करून ठरवलेल्या दराने पैसे दिले जाणार आहे. मात्र काही प्रकल्पग्रस्त वर्गा कडून त्या मोबदल्यात जास्तीत जास्त अधिकचा फायदा कसा घेता येईल यासाठी नियमबाह्य पद्धतीने युक्ती आखली जात आहे. काही ठिकाणी जमिनींच्या दलालांनी तसेच कृषी अधिकारी विभागातील काही बेजबाबदार टोळीने शेतकऱ्यांना त्यांच्या जागेमध्ये शेकडो आंबे किंवा अन्य फळझाडे असलेले कलमी वृक्ष लागवड करण्यात सांगितले आहे तसे केल्याने भविष्यामध्ये राज्य सरकारकडून सर्वेक्षण मध्ये त्या कलमी झाडांच्या मोबदल्यात शेतकऱ्यांना अतिरिक्त पैसे मिळतील , प्रति झाडामागे मोठा आर्थिक लाभ मिळेल असे प्रलोभने दिली जात आहे. अशी भन्नाट युक्ती शेतकऱ्यांना समजताच या सर्व मंडळींनी शेतात कलमी फळ झाडे लावण्याचा प्रतापच केलेला दिसत आहे. यातील काही झाडे तर नीट संगोपन न केल्याने जागेवर सुखली जात आहे. या सर्व घोटाळ्यात सर्वसामान्य जनतेचा कर रुपी पैसा राज्य सरकारकडून माध्यमातून भूसंपादन करणाऱ्या विभागाकडून शेतकऱ्याला देण्यात येणार आहे .हा गौडबंगाल फसवा खेळ व शुद्ध मनाने न केल्याने, अश्या लोकांच्या या सर्व लागवडीचा अहवाल ,नोंद घेऊन पार्श्वभूमी समजून पंचनामा व्हावा व यात चुकीचा उद्देश सिद्ध झाल्यास तशी 7/12 वर तशी नोंदी कराव्यात म्हणजे नक्की सत्य वास्तव काय ते समजेल . सर्वसामान्य जनतेचा कर रुपी पैसा अशा फसव्या लागवडीच्या माध्यमातून देणे म्हणजे एक प्रकारची लुटच म्हणावी लागेल .

अशा प्रकारच्या कलमी झाडांना लागवड करताना हेतू परस्पर त्याठिकाणी लावणे व त्यानंतर त्याच्या मोबदल्यात पंचनामा करून शासनाकडून पैसे लुटणे हा एक प्रकारचा नियोजनबद्ध पद्धतीने आखलेला बेकायदेशीर गुन्हा आहे. यासाठी प्रवृत्त करणारे दलाल व अधिकारी मिळून या षड्यंत्रात शेतकऱ्यांना समावेश करून घेत असल्याने अशा बाबतीत राज्य सरकारने एक शिष्टमंडळ बनवावे व त्या ठिकाण ची माहिती घेऊन सदर प्रकरणात जिल्हाधिकारी , तहसील व मंडळ अधिकारी कार्यालयाला याबाबतीत सखोल चौकशी करावी व अशा फसव्या लाभार्थ्यां वर अंकुश आणावे म्हणजे अश्या गैर जवाबदार घटनांना भविष्यामध्ये रोखता येईल अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत आहे.

# हजरत काजीबाबा यांचा ३ दिवस उरूस

## १ मे रोजी संदल ; अनुक्रमे २ व ३ मे रोजी बहारदार कव्वाल्यांचा कार्यक्रम

**श्रीरामपूर --** दरवर्षा प्रमाणे याही वर्षी शहरातील हजरत काजीबाबा यांचा दिनांक १ ते ३ मे २०२४ असा सलग तीन दिवस संदलसह बहारदार कव्वाल्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती प्रमुख संयोजक श्रीरामपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख व उरूस कमेटीचे अध्यक्ष श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी ज्येष्ठ उपनगराध्यक्ष श्री. दिलीप नागरे आणि फतेह ग्रुपचे अध्यक्ष दानिश शेख यांनी दिली. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गुरूवार दि.१ ते शनिवार दि.३ मे २०२५ असा सलग ३ दिवस या उरूसनिमित कव्वाल्यांचा उत्सव चालणार आहे. गुरूवार दि. १ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी जेष्ठ नगरसेवक पैगंबर वासी पापा जलालभाई शेख यांच्या निवासस्थानासमोरून भव्य अशा संदल मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. शुक्रवार







दि. २ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूर येथील जुबेर सुलतानी तसेच मुंबई येथील नुसरत खानम आणि शनिवार दिनांक ३ मे २०२५ रोजी मुंबई येथील अदनान अजीम नाझा आणि बुऱ्हानपूर येथील तनवीर कौसर यांचा कव्वाल्यांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. मुळा प्रवरा वीज संस्थेचे माजी संचालक , माजी नगरसेवक शहीद आयुबभाई शेख चौकातील फतेह मैदानावर हा ऊरुसाचा कार्यक्रम होणार आहे.उरूस यशस्वीतेसाठी फतेह यंग सर्कल, सरकार ग्रुप, अल्बा ग्रुप, सुभेदार सोशल ग्रुप, अल्नुर युथ फौंडेशन, के.जी. एन. ग्रुप, एकता यंग सर्कल, संजेरी फ्रेंड ग्रुप, मौलाना आझाद युथ फौंडेशन, एस.के. ग्रुप, गरीब नवाज फौंडेशन, अल्कुरेश ग्रुप आदि प्रयत्न शील आहेत. उरूस निमित्त आयोजीत कव्वाल्यांचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उरुस कमेटीचे प्रमुख संयोजक श्रीरामपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख, उरूस कमेटीचे अध्यक्ष श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी ज्येष्ठ उपनगराध्यक्ष दिलीप नागरे आणि फतेह ग्रुपचे अध्यक्ष दानिश शेख यांच्यासह एजाज इनामदार, लाल पटेल, हाजी राज मोहमद रुस्तुमभाई, बाबा इनामदार, पत्रकार हाजी शफीक बागवान, अश्फाक शेख, बरकतअली शेख, असलम बिनसाद, मेहबूब कुरेशी,संजय फंड, अशोक नाना कानडे, आसिफ दारूवाला, श्रीनिवास बिहाणी, संजय छल्लारे, अड.सादिक शिलेदार, अड.तुषार चौदंते, अड. सौरभ गदिया अड.एजाज पठाण इकबाल भाई घडीवाले, रमजान शाह,गोरख साळुंखे, विकी शर्मा, शाहरुख बागवान, फिरोज मुलानी, विनोद गुप्ता, हाजी मतीन शेख, शाहरुख बागवान, तनवीर पांडे, जयेश सावंत, अल्ताफ शेख, हमीद पटेल, गफार पोपटीया, राजू मिर्झा, फिरोज मुलानी, सलीम टर्नर, हाजी मतीन शेख, जाकीर जहागीरदार, रशीद पांडे, दिनमोहमद शेख, समीर खान, शाहिद कुरेशी, मुख्तार काझी, इरफान जीवनी, अजय कदम, मनोज गुप्ता, सागर घोरपडे, पप्पू खान, विकी शर्मा, आशिक अली, नाजीम पिरजादे आदींनी केले आहे.

# महाबोधी महाविहार लवकरात लवकर मुक्त करा !

## नांदेडमधील महामोर्चात भिक्खू व अनुयायांची एकमुखी मागणी

**नांदेड :** बिहार सरकारने टेम्पल ॲक्ट १९४९ हा कायदा रद्द करून बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, या मागणीसाठी मंगळवारी नांदेड शहरातून महामोर्चा काढण्यात आला. नांदेडच्या नवा मोंढा मैदान येथून हजारोंच्या संख्येने निघालेला महामोर्चा दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. येथे बौद्ध भिक्खू आणि शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत बिहार सरकारला निवेदन पाठविण्यात आले.

भारताचा महान राजा सम्राट अशोक यांनी भगवान बुद्ध यांचा विचाराचा प्रचार व्हावा; यासाठी बिहार येथील गया जिल्ह्यात भगवान गौतम बुद्ध यांच्या महाबोधी विहाराची स्थापन केली होती. मात्र, बिहार सरकारने १९४९ मध्ये बुद्धगया मंदिर व्यवस्थित नियंत्रणासाठी बुद्धगया टेम्पल कायदा तयार केला. यामुळे विहाराचे व्यवस्थापन अन्य प्रवर्गातील समुदायाकडे गेले आहे.

ज्याप्रमाणे चर्च, गुरूव्दारा, मंदिर याचे त्या/त्या समुदायाकडून व्यवस्थापन केले जाते. त्याच पद्धतीने महाबोधी विहाराचा संपूर्ण प्रशासकीय ताबा बौद्ध समुदायाकडे द्यावा, १९४९ हा कायदा रद्द करावा, या मागणीसाठी देशभरात आंदोलन सुरू झाले आहे. या अंतर्गत नांदेड येथेही मंगळवारी बौद्ध समाज, भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलाच्या वतीने नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आला.

नवा मोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून सुरू झालेला महामोर्चा महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा यांच्यासह अन्य महापुरुषांना अभिवादन करून दुपारी भर उन्हात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चातील समाज बांधवांकरिता प्रत्येक चौकात पाणपोईची व्यवस्था करण्यात आली होती. सदर महामोर्चात जिल्हाभरातील हजारो बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते.

## नगर येथेही भरणार ऊस उत्पादक शेतकऱ्यांची राष्ट्रीय परिषद

शेवगाव – तामिळनाडूतील नागापट्टणम येथे अखिल भारतीय किसान सभेचे तीन दिवसीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाच्या दुसर्या दिवशी आज बुधवार दि १६ रोजी अखिल भारतीय किसान सभेचे सदस्य कॉम्रेड संजय नांगरे यांनी उसाला एफ आर पी प्रमाणे ऊस दर देण्यात यावा तसेच हे एफ आर पी च्या कायद्याची प्रखरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व कारखानदारांकडून होणारी शेतकऱ्यांची वजनाची काटेमारी तत्काळ थांबविण्यात यावी. हे अहिल्यादेवी नगर जिल्ह्यातील संबंधित शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे दोन प्रश्न उपस्थित करून भविष्यात ऊस दराबाबतचा प्रश्न पेटणार असल्याचे दिसून येत आहे. अखिल भारतीय किसान सभेचे तीन दिवसीय अधिवेशन तामिळनाडूमध्ये नागापट्टिनम येथे सुरू आहे. अहिल्यानगर मध्ये प्रामुख्याने ऊस दराबाबत व कारखानदारांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उसाच्या वजनाबाबतची काटे मारी बाबत ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार व अखिल भारतीय किसान सभा यांच्यामध्ये कायम संघर्ष पहावयास मिळतो. हा प्रश्न अखिल भारतीय किसान सभेच्या राष्ट्रीय अधिवेशनात उचलल्या गेल्यामुळे भविष्यात अहिल्यानगर मध्ये ऊस दराबाबत मोठा संघर्ष होण्याची चिन्हे दिसत आहेत. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे राष्ट्रीय अधिवेशन होणार आहे. अशी माहिती कॉम्रेड संजय नांगरे , संदीप इथापे,निवरूत्ती दातीर यांनी दिली आहे.

## दहशत माजवणाऱ्या चौघांवर तडीपारीची कारवाई

**पुणे :** कोयत्याचा धाक दाखवून आणि तोडफोड करून वाघोली भागात दहशत माजवणाऱ्या चौघांना पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे. रोहन ऊर्फ मोन्या रामप्यारे गिरी (२०), विकास राजू जाधव (२०), आदित्य दीपक कांबळे (१८), वैभव सुभाष पोळ (१८) अशी तडीपार केलेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी पुणे-अहिल्यानगर रोड, वाघोली, बकोरी फाटा, वाघोली बाजारतळ, तसेच आसपासच्या भागात दहशत माजवणे, गंभीर दुखापत करून तोडफोड करणे अशा स्वरूपाचे गुन्हे केले आहेत. हे गुंड नागरिकांना कायम दहशतीखाली ठेवून वारंवार त्रास देत होते. त्यामुळे स्थानिक लोक नेहमी दडपणाखाली वावरत होते. या गुंडांवर वचक बसावा, या उद्देशाने मिळालेल्या प्रस्तावानुसार उपायुक्त जाधव यांनी या टोळीला पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे.

## ठाणे ग्रामीण पोलिसांचा नाविन्यपूर्ण उपक्रम

(छाया : दीपक कुरकुंडे)



ठाणे ग्रामीण पोलिसांच्या वतीने 'आपले पोलीस ठाणे ग्रामीण पोलीस' असा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सदर उपक्रमांतर्गत एक डिजिटल व्हॅनद्वारे जागरूकता व प्रबोधन करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांनी माहिती दिली.

# गेल्या काही वर्षांपासून होणाऱ्या खांद्याच्या वेदनेपासून तिला मिळाला आराम

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ६५ वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार - दुर्बीणीद्वारे केली खांद्यांवर शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**
***नवी मुंबई वार्ताहर**

वर्षानुवर्षे खांद्याच्या वेदना सहन केल्यानंतर अखेर ६५ वर्षीय महिलेला तिचे स्वातंत्र्य परत मिळाले. स्वतःचे केस विंचरणे किंवा एखादी वस्तू उचलणे यासारखी सोपी कामंही तिच्याकरिता आव्हानात्मक ठरत होती. सततच्या वेदना आणि मर्यादित हालचालींमुळे त्रस्त असलेल्या या रुग्णावर खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दुर्बीणीद्वार शोल्डर रिकन्स्ट्रक्टिव्ह शस्त्रक्रिया करण्यात आली. या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर ती आता सामान्य आयुष्य जगत असून तिला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागत नाही. नवी मुंबईत राहणाऱ्या रुग्ण श्रीमती सुरेश देवी (६५वर्ष) या रुग्णाला गेल्या काही वर्षांपासून खांद्याचे दुखणे सहन करावे लागत होते, ज्याचा दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होऊ लागला. सततच्या अस्वस्थतेमुळे अगदी सोप्या कामांनाही तिला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत असे. तिला आरामदायी स्थिती न मिळाल्याने रात्रीच्या वेळी शांत झोप लागत नव्हती. बऱ्याचदा तिला वेदनेमुळे झोपमोड व्हायची. सततच्या वेदनेमुळे तिला तिचा हात हलवण्यासही भिती वाटू लागली होती. कारण थोडीशी जरी हालचाल झाली तरी वेदनांमध्ये



वाढ होत असून अस्वस्थ वाटायचे. दैनंदिन कामांसाठी तिला इतरांवर अवलंबून रहावे लागत होते. तिने यापूर्वी अनेक ऑर्थोपेडिक डॉक्टरांना भेट दिली होती परंतु तिला हवा तसा आराम मिळाला नाही. मेडिकव्हर हॉस्पिटलला भेट दिल्यानंतर, तिला क्रॉनिक रोटेटर कफ टीअरचे निदान झाले, ज्यामुळे तिच्या खांद्याच्या कार्यावर गंभीर परिणाम झाला होता. त्यावर करण्यात आलेल्या यशस्वी शस्त्रक्रियेने तिला केवळ आरामच मिळाला नाही तर नव्याने आयुष्याची सुरुवात करण्याची संधी मिळाली. सततच्या वेदनांनी मी माझ्या खांद्याची हलचाल पुर्ववत होण्याची आशा जवळजवळ गमावलीच होती अशी प्रतिक्रिया रुग्णाने व्यक्त केली.

ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. निखिल भारंबे सांगतात की,* २३ जानेवारी २०२५ रोजी जेव्हा रुग्णाला उपचाराकरिता दाखल करण्यात आले तेव्हा तिला प्रचंड वेदना जाणवत होत्या. 'सुप्रास्पिनॅटस' , 'इन्फ्रास्पिनॅटस' , 'टेरेस मायनर' आणि 'सबकॅपुलॅरिस' अशा चार स्नायूंचा मिळून हा 'रोटेटर कफ' तयार होतो. खांदा स्थिर ठेवण्यासोबत सगळ्या हालचालींमध्ये हे चारही स्नायू एकत्र मिळून कार्य करतात. त्यापैकी एक जरी स्नायू तुटल्यास 'रोटेटर कफ टीअर' हा विकार जडतो. याठिकाणी रुग्णाच्या एमआरआय स्कॅन मध्ये रोटेटर कफ टीअर आढळून आले. रुग्ण लवकर बरा व्हावा यासाठी तसेच आणि दीर्घकालीन कार्यक्षमता टिकवण्यासाठी दुर्बीणीद्वारे आर्थ्रोस्कोपिक शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. *डॉ. विश्वकर्मा सांगतात की,* रोटेटर कफ टीअर झाले असे स्पष्ट झाले की, किती स्नायू तुटलेत, हे जाणून घेणे गरजेचे असते. तेव्हा आम्हाला आढळले की सुप्रास्पिनॅटस, जो वरच्या बाजूस असलेल्या स्नायुंचा समूह आहे आणि खांद्याच्या मागील बाजूस असलेला इन्फ्रास्पिनॅटस तुटला होता. म्हणून, आम्ही ते दुरुस्त करण्यासाठी दुर्बीणीद्वार शस्त्रक्रिया तंत्राचा वापर केला. ही नवी मुंबईतील अशा प्रकारची पहिलीच प्रक्रिया असून यामध्ये रीजेंटेट बायो इंडक्टिव्ह कोलेजन पॅचचा (पुनर्जन्मशील जैव प्रेरक कोलेजन ) पॅच वापर करण्यात आला. रीजेंटेट बायोइंडक्टिव्ह कोलेजन पॅच म्हणजे तुटलेल्या स्नायुंच्या जागी नवीन ऊतींच्या वाढीसाठी तसेच पुन्हा ते तुटण्याचा धोका कमी करण्यासाठी व जखम लवकर भरुन काढण्यासाठी लावली जाणारी पट्टी(पॅच).पॅच लावलेल्या ठिकाणी कोलेजन पातळी वाढते, ज्यामुळे स्नायुंना झालेली दुखापत लवकर भरते. कालांतराने, रुग्ण खांद्याच्या सांध्याचे पुर्ववत होते आणि पुन्हा तुटण्याचा धोका कमी होतो. ही शस्त्रक्रिया २ तास चालली असून रुग्णाला दोन दिवसांत घरी सोडण्यात आले आणि त्यांना नियमित फॉलोअपचा सल्ला देण्यात आला. *डॉ. निखिल भारंबे सांगतात की,* या प्रकरणात स्नायुंमध्ये जवळजवळ तीन ते चार सेंटीमीटर लांबीची पोकळी निर्माण झाली होती, जी या पॅचने यशस्वीरित्या भरून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. आमचे रुग्णालय सर्वोत्तम उपचार प्रदान करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करते. या शस्त्रक्रियेच्या यशामुळे गुंतागुंतीच्या ऑर्थोपेडिक समस्यांवर उपचार करण्यासाठी आणि दीर्घकालीन परिणाम वाढविण्यासाठी आर्थ्रोस्कोपिक तंत्रांचावापर अधोरेखित करण्यात आला आहे. अशा प्रगत उपचारांनी रुग्णांना कमीत कमी वेदना होऊन बरे होण्याचा कालावधी कमी होतो तसेच रक्तस्त्राव कमी होणे आणि चांगल्या दर्जाचे जीवन जगता येते डॉक्टरांच्या कौशल्यामुळे आणि त्यांनी केलेल्या प्रगत उपचारांमुळे, मी आता माझ्या खांदा हलचाल करु शकते तसेच माझा आत्मविश्वासही वाढला आहे. मला पुन्हा वेदनामुक्त जगण्याची संधी दिल्याबद्दल मी मेडिकव्हर हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमची खूप आभारी आहे. मी माझे दैनंदिन जीवन पुन्हा सुरू करण्यास आणि पूर्वीसारखे स्वतंत्र आयुष्य जगण्यास उत्सुक आहे अशी प्रतिक्रिया रुग्ण श्रीमती सुरेश देवी यांनी व्यक्त केली.

# रिसोड पोलिसांनी 12 तासाच्या आत मोबाईल चोरट्याला केली अटक.

## रिसोडचे दबंग ठाणेदार रामेश्वर चव्हाण साहेब यांच्यासह त्यांच्या पथकाची विशेष कामगिरी !!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**



रिसोड पोलीस स्टेशनला नव्याने रुजू झालेले ठाणेदार रामेश्वर चव्हाण हे आल्यापासून अनेक आरोपी रिसोड पोलिसांच्या गळाला लागले आहेत. त्यामुळे परिसरात पोलिसांचा चांगलाच दरारा निर्माण झाला आहे. अनेक अनेकांचे धाबे दणाणले आहेत. तर काही चोरीचे गुन्हे काही तासातच उघडकीस आणल्याने रिसोड पोलिसावर आनंदाचा वर्षाव होत आहे. मोबाईल चोरीच्या पुण्यातील आरोपी 12 तासाच्या आतच रिसोड पोलिसांना गळाला लागल्याने आता अनेकाचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल असा फंडा येथील ठाणेदार रामेश्वर चव्हाण. यांनी दिला आहे.16.4. 2025. या रोजी फिर्यादी गोपाल कडूजी नालेगावकर वय 29. वर्ष व्यवसाय शेती र. धोडप तालुका रिसोड जिल्हा वाशिम. यांनी पोलीस स्टेशन रिसोड येथे रिपोर्ट दिला होता. की दिनांक 15 4 2025 रोजी दुपारी 3.30. 4.00. वाजताच्या दरम्यान बँक ऑफ महाराष्ट्र शाखा रिसोड. येथून कोणीतरी अज्ञात चोरट्याने माझा realme P3. कंपनीचा मोबाईल. चोरून नेला आहे. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील अज्ञातआरोपीचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना पोलीस स्टेशनचे ठाणेदार. मा रामेश्वर चव्हाण यांनी डीबी पथकास दिल्या होत्या. त्यानंतर डीबी पथकास मिळालेल्या माहितीनुसार संशयित इसम नामे नूर खान दौलत खान वय 18. वर्षे रा. पठाणपुरा रिसोड शहर रिसोड ताजी वाशिम. याच दिनांक 16 4 2025. रोजी रिसोड शहरातून ताब्यात घेऊन गुण्या संबंधात विचारपूस केली. असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. व त्याची पंचा समक्ष अंग झडतीत घेतली. असता त्याच्या ताब्यातून सदर गुन्ह्यातून चोरी गेलेला मोबाईल realme P3. कंपनीचा मोबाईल. किंमत रुपये 14500. मुद्देमाल पंचा समक्ष जप्त करण्यात आला. आरोपी नामे. नूर खान दौलत खान रा. पठाणपुरा रिसोड. तालुका रिसोड जिल्हा वाशिम. याच ताब्यात घेण्यात आले असून तपास सुरु आहे. सदरची कामगिरी, मां पोलीस अधीक्षक अनुज तारे. वाशिम( Ips ) मा. अप्पर पोलीस अधीक्षक लता फड. मां सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल. यांच्या मार्गदर्शनाखाली व रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार मां रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली डिबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार श्री किसन नागरे, महादेव चव्हाण पोलीस अमलदार, रवी आढागळे, विनोद धनवट परमेश्वर पुणे यांनी केली आहे. आशा होत असलेल्या कारवाईने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. रिसोड पोलिसांवर आनंदाचा वर्षा होत आहे.

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

# परिणीता सोशल फाऊंडेशन या महाराष्ट्रातील प्रसिद्ध एनजीओचा ‘परिणीता सन्मान पुरस्कार वितरण सोहळा संपन्न





**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

परिणीता सोशल फाऊंडेशन या महाराष्ट्रातील प्रसिद्ध एनजीओचा ‘परिणीता सन्मान’ पुरस्कार वितरण सोहळा आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी राज्याचे उद्योग मंत्री, महाराष्ट्र मा. उदयजी सामंत, पनवेलचे शिल्पकार माजी खासदार मा. रामशेठ ठाकूर, बँक ऑफ महाराष्ट्रच्या पनवेल शाखेचे एजीएम संजीत कुमार, अमरधाम इंडस्ट्रीजचे मा. विजय लोखंडे, माधवबाग, खोपोलीच्या संचालिका डॉ. दिपाली देशमुख, जवाहर इंडस्ट्रीजचे कार्याध्यक्ष स्वप्निल गुप्ते, अल्ट्रा लुब्रिकंटचे सिद्धेश सावंत, एड. प्रथमेश सोमण, श्रीनाथ बिल्डर्सचे संचालक प्रशांत गायकवाड, भावना मोटर्सच्या अपर्णा शाह, सामाजिक कार्यकर्त्या आणि टीआयपीलच्या संचालिका अर्चना परेश ठाकूर, लिली व्हॅलीच्या मीनल पटवर्धन, पुण्याच्या उद्योजिका प्रीती मुतालीक परिणीता संस्थेच्या संस्थापिका साक्षी सागवेकर आणि संस्थापक प्रशांत सागवेकर, परिणीता सन्मानचे सोहळा प्रमुख प्रसाद हनुमंते इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन डॉ मृण्मयी भजक यांनी केलं. या पुरस्कार सोहळ्यात राज्याचे उद्योग तथा राजभाषा मंत्री मा. उदयजी सामंत यांना उद्योग गुरु पुरस्कारानं सन्मानीत करण्यात आलं. पनवेलचे शिल्पकार, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंत्री सामंतांना गौरवण्यात आलं.





त्याआधी मंत्री उदय सामंत यांचा कार्य गौरव सांगणारी एक ध्वनीचित्रफीत दाखवण्यात आली. यात गेली 5 टर्म रत्नागिरीच्या राजकारणावर अधिराज्य गाजवणाऱ्या मंत्री उदय सामंतांच्या अनेक आठवणी परिणीताचे संस्थापक प्रशांत सागवेकर यांनी सांगितल्या. 25 वर्षांपेक्षा अधिक काळची त्यांची मैत्री यातून स्पष्ट दिसून आली. राज्याच्या पहिल्या फळीतला एक मंत्री आपल्या पूर्ण व्यस्त शेड्युलमधून वेळ काढून 50 किलोमीटरहून अधिकच अंतर पार करत वेळेत एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित राहातो, हे फक्त मैत्रितच घडू शकतं. अशी चर्चा या वेळी उपस्थितांमध्ये सुरु असलेली पाहायला मिळाली. आपल्या सत्काराला उत्तर देताना मंत्री उदय सामंत म्हणाले, ‘मी उद्योग गुरु निश्चित नाही पण हा प्रेमाचा सत्कार मी स्वीकारतोय. मी हा पुरस्कार स्वीकारायला इथे आलो नाही तर माझा अनेक वर्षांपासूनचा मित्र प्रशांत सागवेकर आणि त्याची पत्नी साक्षी सागवेकर एक विधायक कार्य करतायत त्यांच्या कार्याला बळकटी देण्याकरता आलोय. आज पर्यंत कधीच मी या कार्यक्रमाला आलो नाही पण इथून पुढे दरवर्षी मी या कार्यक्रमाला येत जाईन. इथून पुढे या सोहळ्याचं पालकत्व मी स्वीकारतो, पुढच्यावर्षी हा सोहळा खूप मोठ्या स्तरावर आपण आयोजित करू. विविध स्तरातील कर्तबगार महिलांचा परिणीता सन्मान देऊन जो बहुमान करण्यात येतोय त्याने मला मनस्वी आनंद झाला’ आजच्या या कार्यक्रमामिनित्तानं प्रशांत आणि साक्षी यांनी अमली पदार्थ विरोधी मोहिम हाती घेण्याचं आवाहन मंत्री उदय सामंत यांनी केलंय. राज्यातला अमली पदार्थांचा प्रश्न गंभीर बनत असताना परिणीता सोशल



फाऊंडेशनला एक वेगळी दिशा देण्याचं काम मंत्री उदय सामंत यांनी केलं. यावेळी पनवेलचे शिल्पकार, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर उपस्थित होते, ते म्हणाले, ‘स्त्रीयांच्या कर्तृत्वाचा हा सोहळा खरच कौतुकास्पद आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या या महिलांचं कार्य मोठं आहे. या सोहळ्याला उपस्थित राहताना मला आनंद होत आहे. तसेच राज्याच्या उद्योग मंत्र्यांचा सत्कार करण्याची संधी मला मिळाली त्याचाही आनंद वाटला. परिणीता सोशल फाऊंडेशनच्या या कार्याला मी शुभेच्छा देतो ’ या कार्यक्रमात संतुलन आयुर्वेदच्या प्रमुख आयुर्वेदाचार्य डॉ. मालविका तांबे यांचा आदर्श परिणीता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. राज्याचे उद्योग तथा राजभाषा मंत्री मा. उदयजी सामंत यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हे या पुरस्कार सोहळ्याचं चौथं वर्ष आहे. दरवर्षी विविध क्षेत्रातील 10 मान्यवर महिला आणि 15 उद्योजिका यांना या पुरस्कारानं सन्मानीत करण्यात येतं. तर विविध क्षेत्रातून एका कर्तबगार महिलेची निवड आदर्श परिणीता सन्मानसाठी करण्यात येते. संस्थेचे संस्थापक स्वतः माहिती घेऊन, महिलांच्या कार्याचा आढावा घेऊन पुरस्कारार्थीची निवड करतात हे या पुरस्कार सोहळ्याचं वैशिष्ट आहे. यावर्षी संतुलन आयुर्वेदच्या प्रमुख, आयुर्वेदाचार्य डॉ. मालविका तांबेंच्या कार्याची माहिती घेण्यात आली. करियरच्या सुरुवातीपासून डॉ. मालविका यांनी श्रीगुरु डॉ. बालाजी तांबे यांच्या मार्गदर्शनात आयुर्वेदासारख्या एका भारतीय शास्त्राच्या अभ्यासात स्वतःला झोकून दिलं. श्रीगुरु बालाजी तांबे यांनी लिहिलेल्या गर्भसंस्कार सारख्या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या पुस्तक लेखनात डॉ. मालविका यांचा मोलाचा वाटा होता. श्रीगुरुंनी केलेल्या अनेक संशोधनातही त्या पुढे असत. श्रीगुरुंनंतर संतुलन आयुर्वेदच्या वैद्यकीय परिक्षण, उपचार, संशोधन या सगळ्या विभागांच्या जबाबदारी डॉ. मालविका यांच्यावर पडली. श्रीगुरुंची शिकवण उराशी बाळगत डॉय मालविका यांनी पूर्वीपेक्षा दुप्पट हिमतीनं, जबाबदारीनं संतुलनच्या कार्यात स्वतःला गुंतवून टाकलं. आपल्या क्षमतेच्या जोरावर त्यांनी हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न सातत्यानं सुरु ठेवलाय. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणूनच परिणीता सोशल फाऊंडेशनने त्यांची निवड यावर्षीच्या आदर्श परिणीता सन्मान या पुरस्कारासाठी केली. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. मालविका म्हणाल्या, ‘माझ्यासाठी हा अत्यंत आनंदाचा क्षण आहे. आपण करत असलेल्या कार्याची आपल्या मागे कुणी गांभीर्यानं दखल घेतंय ही बाब भारावून टाकणारी आहे. अशा पुरस्कारांमुळे आपली जबाबदारीही वाढते, अजून चांगलं काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यात हा पुरस्कार दरवर्षी एकच आहे आणि तो मला जाहीर झाला तेव्हा मनस्वी आनंद झाला मी या पुरस्कारासाठी संस्थेचे, संस्थाचालकांचे आभार मानते.’ या कार्यक्रमाच्या स्वागतस्थळी नवी मुंबईतील सुप्रसिद्घ रांगोळीकार मिताली सुर्वे यांनी काढलेली परिणीता सन्मानची रांगोळी चर्चेचा विषय बनली होती. अप्रतिम रांगोळी साकारुन मिताली सुर्वे यांनी उपस्थितांची मनं जिंकली. या कार्यक्रमात नाट्य क्षेत्रातील दीर्घकालिन योगदानासाठी सुप्रसिद्ध अभिनेत्री सुप्रिया विनोद, हिंदी, मराठी चित्रपट, मालिका क्षेत्रातील वैविध्यपूर्ण भूमिकांसाठी अभिनेत्री जुई गडकरी, पत्रकारीता आणि वृत्तनिवेदिन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी टीव्ही 9 मराठीच्या वृत्तनिवेदिका निखिला म्हात्रे, चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रसिद्ध दिग्दर्शिका स्वप्ना वाघमारे जोशी, मधुरा रेसिपीजच्या माध्यमातून एन्फ्लुएन्सर म्हणून घराघरात पोहोचलेल्या मधुरा बाचल, गायन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी गायिका डॉ. नेहा राजपाल यांना यावर्षीचा परिणीता सन्मान 2025 प्रदान करण्यात आला. यावर्षी परिणीता सन्मान उद्योजिका पुरस्कार विभागात सुमारे 326 अर्ज आले यातून अंतिम 17 जणींची निवड यावर्षीच्या परिणीता सन्मान 2025साठी करण्यात आली आहे. यात राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पनवेल महापालिकेच्या माजी महापौर मा. डॉ. कविता चौतमल, रायगड जिल्ह्यात वकील क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एड. शुभांगी झेमसे, कपडे, वस्तू उद्योग सारख्या क्षेत्रात पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात कार्यरत राहून गरीबांना पोटापाण्याचं साधन उभं करुन देणाऱ्या मा. उल्का देवरुखकर, प्रशिक्षण देऊन उद्योजिका घडवणाऱ्या कामोठे नवी मुंबईतील प्रसिद्ध ज्वेलरी प्रशिक्षक मा. योगिता कलांगे, महिला सौदर्या सारख्या क्षेत्रात आवडीने उभं राहत ब्युटीशियन म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तळोजा येथील ब्युटीशियन मा. दीपाली कानेरे, महिला आरोग्यासाठी कार्यरत राहून महिलांना फिटनेसचं महत्व समजावत महिला आरोग्यासाठी कार्यरत असणाऱ्या पनवेल





मॉडेलिंग सारख्या आव्हानात्मक क्षेत्रात कार्यरत राहून अनेक बॅण्डसाठी मॉडेल म्हणून काम करणाऱ्या पनवेल येथील मा. विद्या घारे, पुण्या सारख्या शहरात आयुर्वेद क्षेत्रात कार्यरत राहून आयुर्वेदिक उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या मा. प्रीती मुतालीक, पनवेल तालुक्यात रियल इस्टेट क्षेत्रात कार्यरत राहून ग्राहक सेवा बजावणाऱ्या बिल्डर मा. प्रेरणा गायकवाड, पनवेल तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रिन्सिपल मा. नंदिनी भाटकर, आर्किटेक्ट सारख्या क्षेत्रात कार्यरत राहून आर्किटेक्चर म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ठाणे येथील आर्किटेक्ट मा. रुपाली तेलवणे, पेटसाठी कार्यरत राहून पेटकॅफे उभारणाऱ्या मा. मीनल गोडबोले, सामाजिक शैक्षणिक कार्यात सक्रीय होऊन विद्यार्थ्यांच्या समस्या अडचणी यावर संशोधनात्मक कार्य करणाऱ्या मुंबईतील ख्यातनाम लेखिका मा. डॉ. स्वाती गानू, वस्त्रोद्योग क्षेत्रात कार्यरत राहून खारघर नवी मुंबई येथील उद्योजिका मा. छाया शेटे, घरगुती खाद्य पदार्थ तयार करुन असंख्य खवैय्यांसाठी चविष्ट खाद्य पदार्थ तयार करणाऱ्या कामोठे पनवेल येथील मा. अनुसया कांबळे, ज्येलरी, ज्वेलरी सारख्या क्षेत्रात महिला येथील मा. माधवी म्हात्रे, ज्वेलरी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करत स्वकल्पनेतून वेगवेगळ्या डिझाईन्स तयार करत कार्यरत असणाऱ्या कामोठे येथील मा. स्वरा ढवळे यांचा या कार्यक्रमात परिणीता सन्मान 2025 या पुरस्कारानं सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी परिणीता सोशल फाऊंडेशनच्या डोंबिवली प्रमुख श्रुती आठल्ये, पलावा विभाग प्रमुख उमा प्रभूदेसाई, पनवेलच्या स्वप्ना साखरे, सोनल थोरात, पनवेल कल्पतरुच्या सीमा राय, नेहा तिवारी, आकांक्षा पाटील आदी परिणीतांनी खूप मेहनत घेतली. परिणीता सन्मान सोहळ्याला दै. सकाळ, टीव्ही9 मराठी, दै. रामप्रहार, मल्हार टीव्ही दै. युवक आधार, माझं साम्राज्य यांचं सहकार्य लाभलं.



